# पिंपरी चिंचवड महानगरपालिका

(नागरी व प्रशासकीय सेवेसाठी आयएसओ 9001:2008 प्रमाणपत्र प्राप्त संस्था)

**ब-क्षेत्रिय कार्यालय, लिंक रोड, एल्प्रो कंपनी आवार, चिंचवड, पुणे-३३.**

Email – bward@pcmcindia.gov.in Website – www.pcmcindia.gov.in

दुरध्वनी क्रमांक – ०२०-२७३५०१५३

जावक क्र. - बक्षे/ १ /कावि/ ९०२८ /२०१५ दिनांक ४/१२/२०१५

विषय- कार्यालयीन शिस्ती बाबात

## परिपत्रक

कार्यालयीन शिस्त ओळखपत्र लावणे,गणवेश परिधान करणे,थंम्ब इप्रेशन करणे,कार्यालयीन वेळेत कामची जागा सोडून इतरत्र फिरु नये. फिरती रजिस्टरला नोंदी घेणे व अद्यावत ठेवणे इ.सह कार्यालयीन नस्ती सादर करताना सादरीकरणाचे स्तर, कार्यालयीन रेकॉर्ड अद्यावत सुस्थितीत ठेवणे,विनापरवाना गैरहजर राहणा-या अधिकारी/कर्मचा-यांवर कारवाई करणे,शासकीय कार्यालयामध्ये प्राप्त झालेल्या निवेदनावर १२ आठवड्यामध्ये कार्यवाही करणे, नागरिक/ग्राहक तक्रार नोंदवही व फिरती करणा-या अधिकारी /कर्मचारी बाबत मा. आयुक्त यांनी

परिपत्रक क्र प्रशासन /तप/कावि/३१२/२०१२ /दिनांक ११/०६/२०१२

क्र प्रशासन /तप/कावि/कावि/२१०/२०१२ दिनांक ३/७/२०१२

क्र प्रशासन /०६/कावि/५२१/२०१३ दिनांक – २५/०४/२०१३

क्र प्रशासन /१/कावि/ ५०४ / २०१३ दिनांक -२३/०४/२०१३

क्र प्रशासन /१०/कावि/७९०/२०१४ दिनांक -१०/११/२०१४

क्र प्रशासन /तप/कावि/५४१/२०१४ दिनांक २/१२/२०१४ अन्वये सर्व अधिकारी /कर्मचारी यांना आदेश सूचना दिलेल्या आहेत. त्याचप्रमाणे प्रभाग अधिकारी ब प्रभाग यांनी परिपत्रक क्र बप्र/१/कावि/४१५/२०१३ दिनांक २३/०५/२०१३ नुसारही कळविले आहे.सदर सर्व परिपत्रकांचे अवलोकन करणेत यावे परंतु मा.आयुक्त यांनी वरील संदर्भिय सूचनांचे परिपत्रकान्वये कळवूनही सदर परिपत्रकातील उपरोक्त विषयांकीत बाबींचे पालन करीत नाही असे माझे निर्दशनांस आलेले आहे. सदर बाब ही अत्यंत ही गंभीर असून शिस्तभंगाचे कारवाईस पात्र आहे.

सबब या परिपत्रकाव्दारे ब क्षेत्रिय कार्यालय सर्व विभाग, अधिकारी /कर्मचारी ( विभाग/ शाखाप्रमुखांसह) यांना कळविणेत येते की उपरोक्त विषयांकीत बाबी संर्दभातील वरील संदर्भिय नुसारचे परिपत्रकान्वये सूचना/आदेशानुसार कार्यवाही पालन करणेची दक्षता घ्यावी. यासंबंधी वर नमूद केलेले कोणत्याही विषयांकीत बाबीचा भंग झालेस संबंधीत अधिकारी / कर्मचारी विरुध्द नियमाधीन कठोर कारवाई करणेत यावी. तदनतंर कोणतीही तक्रार विचारात घेणेत येणार नाही. याची नोंद घ्यावी .

सदरचे परिपत्रक विभागातील सर्व अधिकारी/कर्मचारी यांचे निर्दशनास आणून त्याची दिनांकीत स्वाक्षरी घेणेत यावी.

क्षेत्रिय अधिकारी
ब क्षेत्रिय कार्यालय
चिंचवड-३३

प्रत-
सर्व संबंधित विभाग